**RNI No. MAHBIL /2009/37831**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

**वर्ष ११, अंक १३१(२)]** **मंगळवार, सप्टेंबर १६, २०२५/भाद्रपद २५, शके १९४७** **[पृष्ठे २ , किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक ३२७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ सप्टेंबर २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक संकीर्ण १२२४/प्र.क्र.४७/समन्वय.- ज्याअर्थी, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने शासन अधिसूचना, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक संकीर्ण ०६१५/प्र.क्र.५९/अधिनियम क्र. २७ जुलै, २०१५ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसूचना," असा करण्यात आला आहे) अन्वये त्या विभागाकडून देण्यात येणाऱ्या लोकसेवा, तसेच नियत कालमर्यादेमध्ये लोकसेवा पुरविण्याबाबत पदे निर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपील प्राधिकारी याबाबी उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अधिसूचित केल्या आहेत;

२. आणि ज्याअर्थी, "विकलांगता प्रमाणपत्र देणे" (Issue of Disability Certificate) ही सेवा ही UDID या केंद्र शासनाच्या पोर्टलमार्फत पुरविण्यात येत आहे. त्यामुळे सदर सेवा राज्य शासनाच्या आपले सरकार पोर्टलसोबत संलग्नीकरण करण्यास केंद्र शासनाने नकार दिला आहे;

३. आणि ज्याअर्थी, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांन्वये अधिसूचनेमध्ये या लोकसेवेचे कार्यान्वयन राज्य शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे करता येऊ शकत नाही. त्यामुळे सदर लोकसेवा अधिसूचनेतून वगळणे आवश्यक आहे.

आता, त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१) च्या कलम ३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र शासन उक्त अधिसूचनेतील परिशिष्ट १ मधील अनुक्रमांक १ येथील लोकसेवा वगळत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**संदीप ढाकणे,**
शासनाचे उप सचिव.

## MEDICAL EDUCATION & DRUGS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 15th September 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICE ACT, 2015.

No. Serial 1224/Cr.No.47/coordination.-Whereas, in exercise of the powers vested in it under section 3(*1*) of the Maharashtra Right to Public Service Act, 2015 (Maharashtra Act No. 31 of 2015), the Government of Maharashtra has issued a notification under the Government Notification No. Serial 0615/Cr.No.59/Act No. The Public Service to be provided by the Department, as well as the posts of the Directing Officer, First and Second Appellate Authority for the purpose of the said Act, have been notified *vide* Notification dated 27th July, 2015 (hereinafter referred to as the said Notification);

2. And whereas, the service of "Issue of Disability Certificate" is being provided through the UDID portal of the Central Government. Therefore, the Central Government has refused to integrate the said service with the Aaple Sarkar portal of the State Government;

3. And whereas, in view of the above facts, the implementation of this Public Service under the Maharashtra Right to Public Service Act cannot be done through the Aaple Sarkar portal of the State Government. Therefore, it is necessary to exclude it from the said Public Service Notification.

Now, therefore, in exercise of the powers vested in it under Section 3(*1*) of the Maharashtra Right to Public Service Act, 2015 (Maharashtra Act No. 31 of 2015), the Government of Maharashtra hereby issues the notification in Schedule 1 of the said notification. Excluding public services here.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANDEEP DHAKANE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.